**मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांच्या**
**<u>परिरक्षण अनुदानात वाढ करणेबाबत</u>**

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. मराग्रं २००९/प्र.क्र.२३६/साशि-५,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१२.

वाचा : १) शासन निर्णय, क्र. एलआयबी १०९६/७५/(८०)साशि-५, दिनांक २२ जानेवारी १९९८
२) शासन निर्णय, क्र. मराग्रं १००१/ (४१२) साशि-५, दिनांक १ ऑगस्ट २००२
३) शासन निर्णय, क्र. मराग्रं १००३/२२९/(११३/०३)साशि-५, दिनांक १३ मे. २००४
४) शासन निर्णय क्र. मराग्रं १००४/(१२६/०४)साशि-५, दिनांक ९ मार्च, २००५

<u>प्रस्तावना</u> : महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहाय्यक अनुदान आणि इमारत व साधन सामग्री यासाठी मान्यता) नियम १९७० मधील तरतूदीनुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना परिरक्षण अनुदान मंजूर करण्यात येते. उपरोक्त संदर्भ क्र. १ वरील शासन निर्णयान्वये राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना विहित कमाल मर्यादेच्या अधीन राहून अनुज्ञेय खर्चाच्या ९०% परिरक्षण अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या परिरक्षण अनुदानात दिनांक १.१.१९९८ पासून वाढ करण्यात आली होती. त्यानंतर संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये काही प्रमाणात वाढ करण्यात आली होती. परंतु ग्रंथ व नियतकालिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली आणि इतर खर्चात झालेली वाढ विचारात घेऊन, तसेच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयामधील कर्मचा-यांच्या वेतनात वाढ व्हावी व ग्रंथालयांना अधिक पुस्तके/नियतकालिके विकत घेता यावीत, या उद्देशाने, संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये हे परिरक्षण अनुदान दुप्पट करण्यात आले आहे. दिवसेंदिवस वाढणारी महागाई व वाढत्या किंमती यांचा विचार करुन सार्वजनिक ग्रंथालयांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होणे क्रमप्राप्त आहे. तसेच ग्रंथालयांच्या परिरक्षणाच्या अनुषंगाने आवश्यक असणाऱ्या बाबींचा खर्चमेळ घालण्यासाठी वाढीव सहाय्य मिळणे आवश्यक आहे. त्याबाबत वेळोवेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव दिनांक २८.१२.२०११ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णयार्थ

सादर करण्यात आला होता. त्यानुसार मंत्रिमंडळात घेण्यात आलेल्या निर्णयाच्याआधारे सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानात वाढ करण्याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय** : सोबत जोडलेल्या **परिशिष्ट - अ** मध्ये दर्शविल्याप्रमाणे "अ","ब","क","ड", वर्गाच्या शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुज्ञेय असलेल्या परिरक्षण अनुदानात दि.१.४.२०१२ पासून विद्यमान दराच्या ५०% वाढ करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे-

२. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणारे अनुदान ग्रंथालयाने मागील वर्षी केलेल्या अनुज्ञेय खर्चावर आधारित असल्यामुळे दिनांक ३१ मार्च २०१२ पर्यंत मान्यता देण्यात आलेल्या ग्रंथालयांना परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या परिरक्षण अनुदान मर्यादेच्या अधीन राहून निर्धारित होणा-या, खर्चावर आधारित अनुज्ञेय अनुदानाइतके तदर्थ अनुदान मंजूर करण्यात येईल. तसेच परिरक्षण अनुदानासाठी अनुज्ञेय खर्चाची मर्यादा पूर्वीप्रमाणेच ९०% इतकी राहील.

३. या अनुदानासाठी मान्यताप्राप्त ग्रंथालयांनी खालील अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील :-

अ) १९९५-९६ पासून सर्व शासनमान्य ग्रंथालयांना अनुज्ञेय खर्चाच्या ५० % रक्कम ग्रंथालय कर्मचा-यांच्या वेतनावर खर्च करणे आवश्यक केले आहे. १९९६-९७ पासून देय होणा-या परिरक्षण अनुदानाचे वेतन व वेतनेतर असे दोन समान भागात वर्गीकरण करण्यात येऊन ते मिळण्यासाठी मागील वर्षी उपरोक्त वेतन व वेतनेतर या बाबीवर किमान अनुज्ञेय खर्च करणे आवश्यक केले आहे. ही अनुदान निर्धारण व्यवस्था कायम राहील.

ब) वाढीव अनुदानापैकी ५० % रक्कम ग्रंथालयातील दिनांक ३१/३/२०१० रोजी आकृतिबंधानुसार प्रत्यक्ष सेवेत असलेल्या कर्मचा-यांच्या वेतनावर वाढीव वेतन म्हणून खर्च करण्यात यावी.

क) मान्यताप्राप्त ग्रंथालयांतील दिनांक ३१/३/२०१० रोजी सेवेत असलेल्या कोणत्याही कर्मचा-यास कमी करण्यापूर्वी तसेच कर्मचा-यांच्या पद संख्येत वाढ करण्यापूर्वी किंवा ती कमी करण्यापूर्वी ग्रंथालयांनी ग्रंथालय संचालकांची विहित मार्गाने अनुमती घेणे आवश्यक राहील.

ड) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचा-यांची पदसंख्या व पदनाम याचा आकृतिबंध शासन निर्णय दिनांक २२ जानेवारी १९९८ अन्वये निश्चित केल्याप्रमाणे कायम राहील. त्यानुसार कर्मचारी ग्रंथालयात असणे आवश्यक आहे.

इ) अनुदानप्राप्त शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या वर्गणीदार सदस्य आणि वृत्तपत्र व नियतकालिकांची संख्या खालीलप्रमाणे आवश्यक राहील-

| ग्रंथालयाचा दर्जा | किमान सदस्य संख्या | | वृत्तपत्र | | नियतकालिकांची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान | सुधारित | विद्यमान | सुधारित | विद्यमान | सुधारित |
| अ | ३०१ | ५०० | १६ | १६ | ५१ | ७५ |
| ब | १०१ | २५० | ६ | ६ | १६ | २५ |
| क | ५१ | १०० | ४ | ४ | ६ | १० |
| ड | २६ | ५० | ४ | ४ | ६ | ६ |

फ) ग्रंथालयांनी आपली वर्गणी व अन्य उपलब्ध स्त्रोतांमध्ये वाढ करुन उत्पन्न वाढवावे.

४. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची शालेय शिक्षण विभागामार्फत करण्यात आलेल्या पटपडताळणीच्या धर्तीवर तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर केल्यानंतरच नविन मान्यता, दर्जोन्नती व वाढीव अनुदान देण्याबाबतची कार्यवाही करावी.

५. सार्वजनिक ग्रंथालयांना देण्यात येणारी अनुदान वाढ, ही सर्वंकष पडताळणी/ तपासणी झाल्यानंतरच अनुज्ञेय राहील.

६. शासनमान्य ग्रंथालयाच्या कामकाजाचा दर्जा तपासून अशा परिरक्षण अनुदानाचे वाटप करण्याकरीता, संचालक, ग्रंथालय यांचेकडे टप्प्याटप्प्याने सुपूर्द करण्यात येईल. अनुदानाचे वाटप आणि त्यामधून झालेला खर्च याबाबतचा मासिक अहवाल संचालक, ग्रंथालये यांनी शासनास सादर करावा.

७. सर्व शासनमान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांनी त्यांचेबावत राविस्तर माहिती (ग्रंथालयाचा दर्जा, उपलब्ध सर्व सोयीसुविधा, इत्यादी माहिती) जनतेसाठी उपलब्ध करुन द्यावी.

८. या बाबीवरील खर्च - मागणी क्रमांक " डब्ल्यू ४"

अ) "२२०५ कला व संस्कृती

१०५ सार्वजनिक ग्रंथालये

(०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य

(०३)(०१) सहाय्यक अनुदाने (२२०५ ०२९८) (योजनेतर),

आणि

ब) २२०५ कला व संस्कृती,

(०३) मध्यवर्ती, जिल्हा व तालुका ग्रंथालयांना सहाय्य

पंचवार्षिक योजनांतर्गत योजना

(०३)(०६) सार्वजनिक ग्रंथालयांना सहाय्य (राज्य) (२२०५१३५६) योजनांतर्गत,

या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकाया व त्याअंतर्गत मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

क) तसेच ग्रामपंचायत स्तरावरील ग्रंथालये जिल्हा परिषदांकडे हस्तातरित करण्यात आली असल्यामुळे सदर ग्रंथालयांसाठी होणारा खर्च हा,

मागणी क्र. " डब्ल्यू ४"

२२०५- कला व संस्कृती,

१०५ सार्वजनिक ग्रंथालये,

(०४) स्थानिक क्षेत्राखालील योजना,

(०४)(०१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १०० अन्वये जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (ग्राम पंचायत ग्रंथालयांना सहाय्यक अनुदाने (२२०५-११९-६) योजनेतर (दत्तमत)

या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्याअंतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

९. वाढीव अनुदानाच्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे ग्रंथालयांनी विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

१०. हे आदेश मंत्रीमंडळाच्या मान्यतेने तसेच नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७०३/११/व्यय-५, दिनांक १५.१२.२०११ अनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

११. सदरचा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावरुन प्रसारित करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१२०२२२१०५६४९२४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(बा.ऑ. हेमाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : परिशिष्ट-अ

प्रति,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ) मुंबई/नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी मुंबई
राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
सर्व सहाय्यक ग्रंथालय संचालक,
ग्रंथपाल, सर्व शासकीय विभागीय ग्रंथालये,
ग्रंथपाल, सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालये,
अध्यक्ष, सर्व राज्य, विभाग व जिल्हा ग्रंथालय संघ,
मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, मुंबई
सर्व जिल्हा कोषाधिकारी / उप कोषागार, नवी मुंबई
वित्त विभाग (व्यय-५) (अर्थसंकल्प-३)/ नियोजन विभाग (१४२३/१४७१)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
साशि-१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय
जनसंपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (साशि-५),

**शासन निर्णय क्रमांक मराग्रं- २००९/प्र.क्र.२३६/साशि-५, दि. २१ फेब्रुवारी,२०१२ चे सहपत्र**

## परिशिष्ट 'अ'

| ग्रंथालयांचा वर्ग | २००४-२००५ पासून विहित केलेले अनुदान (रुपये) | विद्यमान अनुदानात ५०% वाढ केल्याने होणारा अनुदान दर (रुपये) |
|---|---|---|
| वर्ग - अ जिल्हा ग्रंथालये | ४,८०,०००/- | ७,२०,०००/- |
| वर्ग - अ तालुका ग्रंथालये | २,५६,०००/- | ३,८४,०००/- |
| वर्ग - अ इतर ग्रंथालये | १,९२,०००/- | २,८८,०००/- |
| वर्ग - ब जिल्हा ग्रंथालये | २,५६,०००/- | ३,८४,०००/- |
| वर्ग - ब तालुका ग्रंथालये | १,९२,०००/- | २,८८,०००/- |
| वर्ग - ब इतर ग्रंथालये | १,२८,०००/- | १,९२,०००/- |
| वर्ग - क तालुका ग्रंथालये | ९६,०००/- | १,४४,०००/- |
| वर्ग - क इतर ग्रंथालये | ६४,०००/- | ९६,०००/- |
| वर्ग - ड ग्रंथालये | २०,०००/- | ३०,०००/- |

( वा.ओं.हेमाडे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

-----------